पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मुख्यलेखापरिक्षण विभाग
क्र. मुलेप/१अ/कावि/९५३/२०२२
दि. १७-११-२०२२

**विषय- लेखापरीक्षण कामकाजाबाबत. . .**

परिपत्रक

मुख्यलेखापरीक्षण विभागामार्फत सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीतील महापालिकेच्या विविध विभागांचे लेखापरीक्षण सुरु करण्यात आलेले आहे. सदरचे लेखापरीक्षण कामकाज प्राधान्याने व लवकरात लवकर पूर्ण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम १०५ (२) नुसार मुख्यलेखापरीक्षक मागणी करतील असे सर्व अभिलेख संबंधित विभागांनी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, लेखापरीक्षणाकरीता अभिलेख उपलब्ध करुन देणेस संबंधित विभागांमार्फत विलंब केला जात असून सदरची बाब ही गांभीर्यपूर्वक घेतली जात नाही. त्यामुळे लेखापरीक्षण कामकाज विहित कालमर्यादेत पुर्ण करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासुन लेखापरीक्षण कामकाजाची कार्यपध्दती सुधारीत करण्यात आलेली असुन त्यानुसार अनामत रकमेचा परतावा करणेपूर्वी निविदा नस्तींचे लेखापरीक्षण केले जात आहे.

तरी प्रस्तुतचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविणेत येते की, लेखापरीक्षणाकरीता सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ या कालावधीतील अनामत परताव्याचे संदर्भातील नस्ती लवकरात लवकर लेखापरीक्षणाकरीता सादर करुन त्यांचे लेखापरीक्षण पूर्ण करुन घ्यावे. त्याचप्रमाणे इतर विभागांनी सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीचे लेखापरीक्षणाकरीता आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन त्याप्रमाणे मुख्यलेखापरीक्षण विभागास अवगत करावे. जेणेकरुन सन २०१५ ते १८ या कालवधीतील लेखापरीक्षणाचे नियोजन करणे मुख्यलेखापरीक्षण कार्यालयास शक्य होईल.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

प्रति,
सर्व विभाग

D:\TABLE-1A\Audit\Letter_A4.docx